# कर्तव्यावर जात असलेल्या सैनिकाचे अज्ञातांकडून अपहरण

## ग्रामस्थांनी वाचविले प्राण | महाराष्ट्र-मध्यप्रदेशच्या सिमेवर थरार







**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.14 )** - गोंदीया येथून लेह लद्दाख येथे कर्तव्यावर जात असलेल्या आर्मीतील सैनिकाचे अज्ञातांकडून अपहरण करण्यात आले. या सैनिकाला बेदम मारहाण करत महाराष्ट्र-मध्यप्रदेशच्या सिमेवर असलेल्या चिचोली येथे आणण्यात आले. या सैनिकाने बोलेरो वाहनातून उडी घेतल्यानंतर ग्रामस्थ त्याच्या मदतीला धावल्याने त्याचे प्राण वाचले. त्याच्यावर बैतुल जिल्ह्यातील चिचोली येथे उपचार सुरु आहेत.

मुकेश गुडडू गौड ( वय 27, रा.गोंदीया) असे या जवानाचे नाव आहे. मुकेशजवळ आर्मीचे ओळखपत्र आढळल्याने तो भारतीय सैनिक असल्याचे पुढे आले. मुकेश हा गोंदीया येथून आपल्या कर्तव्यावर लेह लद्दाख येथे जाण्याकरिता 15 दिवसांपुर्वी रेल्वेत बसला होता. त्यानंतर त्याचे अपहरण झाले. त्याला एका बोलेरो वाहनातून घेवून जात असताना महाराष्ट्र-मध्यप्रदेशच्या सिमेवर असलेल्या चिचोली( जि.बैतुल) येथे मुकेशने चालत्या वाहनातून उडी घेतली. यावेळी दोन अपहरणकर्ते वाहनातून खाली उतरले आणि मुकेशसोबत मारहाण करु लागले. यावेळी उपस्थित गावकरी मुकेशच्या मदतीला धावल्याने अपहरणकर्ते तेथून पळून गेले.

### जवान मुकेश च्या अंगावर अनेक घाव

जवान मुकेश च्या अंगावर अनेक घाव आढळून आले. जे ब्लेड ने मारल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. गावकऱ्यांनी 100 नंबरवर कॉल करुन पोलिसांना घटनेची माहिती दिली. परंतू पोलीस वेळेवर न पोहोचल्याने ग्रामस्थांनीच मुकेशला रुग्णालयात दाखल केले. घटना कशी घडली आणि अपहरणकर्ते कोण होते, हे काहीच त्याला आठवत नाही. घटनेची माहिती भंडारा डिस्ट्रीक कमांडर किरण गोस्वामी यांना देण्यात आली. त्यानंतर काही सैनिकांना चिचोली येथे पाठविण्यात आले आहे.

# शेतात बांधलेल्या कालवडीला बिबट्याने केले फस्त

## पांढरघाटी परिसरातील घटना ■ शेतकऱ्यांमध्ये दहशत



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.14 )** - तालुक्यातील पांढरघाटी येथील शेत शिवारातील एका कालवडीची बिबट्याने शिकार केल्याची घटना शुक्रवार (दि.14) ला मध्यरात्रीच्या दरम्यान घडली. सदर घटना सकाळी नऊ वाजता उघडकीस आली. या घटनेमुळे पुन्हा एकदा पांढरघाटी परिसरामध्ये बिबट्याची दहशत पसरली असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, पांढरघाटी येथील शेतकरी मोतीराम साखरे यांच्या शेतातील कालवड मृतावस्थेत अज्ञात वण्यप्राण्याने खाल्लेल्या अवस्थेत आढळून आली. ही शिकार बिबट्याने केली असावी असा संशय निर्माण होत आहे. सदर घटना गुरुवार-शुक्रवारी मध्यरात्रीच्या दरम्यान घडल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मोतीराम साखरे यांनी वनविभागाचे अधिकारी यांना दिली. वनविभागाचे लाखारा, उमरखेड व मोर्शीचे अधिकारी यांनी पंचनामा केला असता अज्ञात प्राण्याने त्या कालवडीची शिकार केल्याचे निष्पन्न झाले ज्या प्राण्याने शिकार केली, तो प्राणी हा बिबट असावा असा संशय वनविभागाच्या अधिकाऱ्यांना आला त्यामुळे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी परिसरातील शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या अज्ञात प्राण्याचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने काहीतरी मार्ग काढावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे या परिसरामध्ये शेतकऱ्यांना अशा हिंसक प्राण्यापासून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वनविभागाने शिकार केलेल्या कालवडीच्या मालकाला नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. नुकसान भरपाई मिळण्यासाठी ऑनलाईन अर्जाची प्रक्रीया वनविभागाकडून करण्यात आली असल्याची माहिती शेतकऱ्याने दिली आहे.

# मजिप्राकडून कारवाईचा बडगा

### 250 पेक्षा अधिक ग्राहकांची नळजोडणी खंडित

### काही शासकीय कार्यालयांनाही नोटीस

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )** - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने पाणीपट्टी देयक वसुलीसाठी मोहीम सुरू केली आहे. महापालिका क्षेत्रातील ग्राहकांकडे तब्बल 450 कोटी रुपयांचे देयक थकीत असल्याने पाणीपुरवठा योजना कशी चालवायची, असा प्रश्न प्रशासना समोर उभा ठाकला आहे. त्यामुळे गत दीड ते दोन महिन्यांत सुमारे दीड हजार नळजोडणीधारकांना नोटीस देण्यात आल्या असून, त्यापैकी 250 पेक्षा अधिक नळजोडणी धारकांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

महापालिका क्षेत्रात एकूण 1 लाख 2 हजार 416 नळजोडणीधारक आहे. सिंभोरा धरणापासून 55 किमी अंतरावरील अमरावती शहरापर्यंत पाइपलाइनद्वारे पाणी आणणे, त्यानंतर जलशुद्धीकरण करून 25 पाणीटाक्यांद्वारे प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविणे आदी प्रक्रियेसाठी वार्षिक 36 कोटी रुपयांचा खर्च येतो. त्या तुलनेत आतापर्यंत सुमारे 24 कोटी रुपयेच वसूल झाले आहे. याचाच अर्थ 12 कोटी रुपयांनी ही योजना तोट्यात आहे. याशिवाय ग्राहकांकडील जुन्या थकबाकीचा आकडा वेगळाच आहे. त्यातच आर्थिक वर्ष 2024-25 संपायला जेमतेम दीड महिना शिल्लक आहे. एवढ्या कमी कालावधीत पाणीपट्टी देयक वसूल करण्याचे आव्हान प्रशासनासमोर आहे. त्यामुळे वारंवार आवाहन करूनही प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदार ग्राहकांच्या नळजोडण्या खंडीत करणे, 90 टक्के थकबाकीदार ग्राहक असलेल्या भागातील संपूर्ण

पाणीपुरवठा बंद करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच अवैध नळ जोडणी धारकांनी दंडासह नळजोडणी वैध करून न घेतल्यास त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचाही निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे आतापर्यंत सुमारे 250 थकबाकीदार ग्राहकांवर कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती मजीप्राच्यावतीने देण्यात आली आहे.

# पेपर देऊन परतणाऱ्या विद्यार्थ्यांचा अपघातात मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा,( दि.14 )**- बारावीचा पेपर देऊन परत येणार्या विद्यार्थ्याचा चिखलदरा तालुक्यातील डोमा-काटकुंभमार्गावर (दि.12) अपघातात मृत्यू झाला. पंकज शंकर मोरले (18, रा.काटकुंभ) असे मृताचे तर पंकज लखन गोहे (19, रा.कांटकुभ) असे जखमी विद्यार्थ्यांचे नाव आहे. पंकज मोरलेचा बारावीचा पेपर होता. त्यासाठी मित्र पंकज गोहे सोबत तो दुचाकीने डोमा येथे आला. पेपर दिल्यानंतर सायंकाळी तो आपल्या गावाकडे परत जात होता. या दरम्यान समोरून येणाऱ्या ट्रॅक्टरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात पंकज मोरलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर त्याचा मित्र पंकज गोहे गंभीर जखमी झाला. काटकुंभ पोलिस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमी पंकजला धारणी येथील रुग्णालयात दाखल केले. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. मध्य प्रदेशातील भैसदेही आणि चिखलदरा-परतवाडा मार्गावरील डोमा-काटकुंभ हा मार्ग अतिशय अरुंद आहे. परिणामी समोरून वाहन आल्यास वाहतुकीस अडचण निर्माण होते. याच ठिकाणी दुचाकी व ट्रॅक्टरचा अपघात झाला.

# टांगा चौकात ट्रकने इसमास चिरडले

**महासागर प्रतिनिधी**


**परतवाडा, ( दि.14 )**- भरधाव ट्रकने एका इसमाला चिरडल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना (दि.13) परतवाडा शहरात टांगा चौक परिसरात घडली.परतवाडा शहरातील अतीव्यस्त असणाऱ्या टांगा चौक ते नृसिंह मंदीराकडे जाणाऱ्या मार्गावरील पालिकेच्या खुल्या जागेत चारचाकी वाहने दुरूस्तीचे काम केल्या जाते. त्यामुळे जड व इतर वाहनांची सतत वर्दळ असते. याच मार्गावर देशी दारू विक्रीचे दुकान आहे. दरम्यान 13 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 7.30 वाजताच्या सुमारास ट्रक क्रमांक एमएच 31 एपी 3824 हा जात असतांना अचानक एक इसम चाकाखाली आल्याने त्याचा घटनास्थळी मृत्यू झाला. मृत इसमाची ओळख पटली नव्हती.

# गृहमंत्री शहा यांचा शंकर बाबांना थेट फोन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )**- बेवारस, दिव्यांग मुलांना पितृछत्र देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्यभर धडपड करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांचा वाढदिवस एरवी अत्यंत साधेपणाने वझ्झर येथील अंबादासपंत वैद्य दिव्यांग, बेवारस बालगृहात साजरा केला जातो. पण, त्यांचा 84 वा वाढदिवस (दि.14) खास झाला तो केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्या आश्चर्यचकित करणार्या फोनवरील संभाषणाने. बालगृहातील मुले-मुली आपल्या बाबांच्या वाढदिवसाच्या तयारीत गुंतलेले असताना सकाळी देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचा शंकरबाबांना फोन आला. अमित शहा यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दोघांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चा झाली. बेवारस, दिव्यांग मुला-मुलींच्या पुनवर्सनाचा कायदा व्हावा, या मागणीचा पुनरूच्चार शंकरबाबा यांनी चर्चेदरम्यान केला, त्यावर निश्चितपणे हा कायदा केला जाईल, असे आश्वासन अमित शहा यांनी दिले.

वझ्झर येथील बालगृहात 123 मुला-मुलींच्या उपस्थितीत शंकरबाबा यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी बालगृहातील मुला-मुलींनी त्यांचे औक्षण केले. त्यांचे आशीर्वाद घेतले. याआधी गृहमंत्री अमित शहा यांच्या स्वीय सहायकांनी शंकरबाबा यांच्याशी फोनवर संपर्क साधला. अमित शहा हे आपल्याशी बोलू इच्छितात असे, त्यांनी सांगितल्यानंतर शंकरबाबा



### वाढदिवसाच्या दिल्यात खास शुभेच्छा

यांच्यासाठी हा आनंदाचा सुखद धक्का होता. गृहमंत्र्यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. सुमारे अर्धा तास दोघांमध्ये चर्चा झाली.

देशाच्या गृहमंत्र्यांनी आपल्या वाढदिवसाची आठवण ठेवावी आणि संवाद साधावा, हा आनंदाचा क्षण असल्याचे शंकरबाबा पापळकर म्हणाले. अचलपूर तालुक्यातील वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य दिव्यांग, बेवारस बालगृहाच्या माध्यमातून त्यांचे कार्य अविश्रांतपणे सुरू आहे. शंकरबाबांच्या बालगृहात राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून बेवारस दिव्यांग मुले आजीवन पुनर्वसनासाठी दाखल होतात. या ठिकाणच्या 123 मुला-मुलींच्या नावापुढे शंकरबाबा पापळकर यांचे नाव लागते.या मुलांच्या शिक्षणापासून ते त्यांच्यावरील उपचार आणि त्यांचे विवाह लावून देण्याची जबाबदारी शंकरबाबा यांनीच सांभाळली. आजवर 30 मुला-मुलींचे लग्न करून देताना त्यांच्या योग्य पुनर्वसनाचा आराखडा शंकरबाबा यांनी तयार केला आहे. 18 वर्षे पूर्ण झालेल्या मुलांना बालगृहात ठेवता येत नाही, असा नियम आहे. मात्र दिव्यांग, मतिमंद, दृष्टिहीन मुले व मुली कुठे जाणार, असा प्रश्न करून या मुलांच्या पुनर्वसनासाठी सरकारने कायदा करावा, अशी शंकरबाबांची मागणी आहे. ही मागणी त्यांनी पुन्हा एकदा गृहमंत्री शहा यांच्याकडे केली आहे.

बालगृहाच्या माध्यमातून दिव्यांग आणि अनाथ मुलांचे आधारवड असलेले ज्येष्ठ समाजसेवक शंकरबाबा पापळकर यांना सामाजिक कार्यासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आले आहे.

# भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही; पण आम्ही शेतकऱ्यांना विमा देतो

### कृषिमंत्र्यांचे वादग्रस्त वक्तव्य




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 )**- भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही, आम्ही एक रुपयात शेतकऱ्यांना पीक विमा देतो, असे वादग्रस्त वक्तव्य माध्यमांशी बोलताना राज्याचे कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी शुक्रवारी येथे केले. या वादग्रस्त व्यक्तव्यानंतर राज्यात चांगलेच पडसाद उमटले आहे.

ना. कोकाटे जिल्हा कृषी प्रदर्शनीचे उद्घाटन व शेतकऱ्यांशी परिसंवाद साधण्यासाठी अमरावतीला आले होते. यावेळी माध्यमांनी त्यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी पीक विम्यासंदर्भात असे वक्तव्य केले. ते म्हणाले एक रुपयात पीक विमा योजना बंद करण्याचा शासनाचा कोणताही विचार नाही. भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही. आम्ही एक रुपयात शेतकऱ्यांना पीक विमा देतो. त्याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न काही लोकांनी केला आहे. अन्य राज्यातील लोकांनी यामध्ये अर्ज केले.

याबाबत चौकशी केली असताना लक्षात आल्याने चार लाख अर्ज रद्द करण्यात आले. कुठे तरी सीएससी केंद्रवाले असे काही उद्योग करीत असावे, असा माझा संशय आहे. काही जणांवर कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे ना. कोकाटे म्हणाले. वक्तव्यादरम्यान कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यासोबत केल्याचा आरोप आता विरोधकांद्वारे केल्या जात आहे. त्यामुळे ना. कोकाटे यांचे हे वादग्रस्त वक्तव्य चांगलेच चर्चेत आले आहे.

### जबाबदारीने बोलावे, भाजपचा सल्ला

शेतकरी अन्नदाता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा उल्लेख आदरानेच व्हायला पाहिजे, असा सल्ला भाजपचे प्रवक्ते प्रवीण दरेकर यांनी कृषिमंत्र्यांना दिला आहे तर विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते या वक्तव्यावर चांगलेच संतापले, ते म्हणाले शेतकऱ्याला आपण अन्नदाता संबोधतो. त्यांना भिकाऱ्याची उपमा देणे योग्य नाही, सरकार एक रुपयात पीक विमा देते म्हणजे उपकार करते करते का, असा सवाल त्यांनी केला तर लोकभावना दुखावणार नाही, याची काळजी घ्यावी, असा सल्ला राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आनंद परांजपे यांनी कृषिमंत्र्यांना दिला.

"एक रुपयांमुळे बाहेरच्या कंपन्यांचे गैरप्रकार वाढले. बाहेरच्या कंपन्यांनी त्यामध्ये ऑनलाइन अर्ज भरले. एक रुपयात विमा स्वस्त असल्याने त्या कंपन्यांनी गैरफायदा घेतला. हा गैरफायदा घेऊ नये म्हणून विम्याच्या संदर्भामध्ये आम्ही पुनर्विचार करत आहे. त्यामध्ये अभ्यास करून धोरण ठरवू, माझ्या वक्तव्याचा विर्पयास केला गेला.

**माणिकराव कोकाटे, कृषिमंत्री**



# ग्रामपंचायत कार्यालय चिरोडी

## पंचायत समिती, चांदूर रेल्वे, जि.अमरावती

## जाहिर निविदा सुचना क्र. १/२०२५

ग्रामपंचायत चिरोडी ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती सन २०२४-२०२५ मध्ये विविध योजना अंतर्गत खालील कामाचे बी-१ व ई-निविदा अंतर्गत जिल्हा परिषद बांधकाम विभाग अमरावती यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित किंमत | कामाची मुदत | पंजीबद्ध कंत्राटदाराचे वर्गीकरण | केलेल्या निविदेची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्मशानभूमीला वॉल कंपाऊंड करणे | जनसुविधा | ८.२० लक्ष | ६ महिने | वर्ग ६ व त्यावरील | ५००/- |

प्रमुख अटी :-

१) निविदा प्रसिद्धी तारीख व वेळ दि. १५/०२/२०२५ वेळ ११.०० वाजता

२) वरील कामाच्या निविदा मिळण्यासाठी अर्ज करण्याची व स्विकारण्याची तारीख दि. १५/०२/२०२५ ते दि. २२/०२/२०२५ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून.

३) निविदा उघडण्याची तारीख येणाऱ्या मासिक सभेत.

४) बयाना रक्कम १ टक्के डी.डी. स्वरूपात राहिल. निविदा फी व बयाना रक्कम Online पद्धतीने भरण्यात यावे.

अट :- १) निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत चिरोडी, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

२) निविदा ह्या दोन लिफाफा पद्धतीने करावयाचा आहेत.

३) निविदा स्विकारण्याचे तसेच काही कारणास्तव रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहे.

सरपंच/सचिव
**ग्रामपंचायत कार्यालय चिरोडी**
पंचायत समिती चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कुऱ्हा पोलीसांचे सालोरामध्ये अवैध दारू विक्री विरोधात धाडसत्र

## गावाची दारूबंदीच्या दिशेने वाटचाल



**महासागर प्रतिनिधी**

**कुऱ्हा,( दि.14 )-** कुऱ्हा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सालोरा (बु.) असलेल्या गावात अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असून या गावकऱ्यांच्या मदतीने कुऱ्हा पोलीसांनी अवैध दारू विक्री विरोधात धाडसत्र सुरू केले आहे. त्यामुळे आता गावाची दारूबंदीच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे भासत आहे. गेल्या काही दिवसांपासून सालोरा (बु.) या गावात अवैध दारू विक्री चांगलीच फोफावली होती. ज्यामुळे गावातील शांतता भंग होण्यासोबत क्षुल्लक कारणावरून वाद, भांडण, तंट्याचे प्रकरणे वाढली होती. त्यामूळे ग्रामपंचायतीने गाव दारू बंदीचा ठराव घेत कुऱ्हा पोलीसांचे सहकार्य घेतले. यासाठी पोलिसांनी देखील वेळोवेळी सहकार्य करण्याचे आश्वासन देत गावात किंवा गावाशेजारी सुरू असलेल्या अवैध दारू विक्री विरोधात कार्यवाहीची कडक मोहीम राबवून गाव दारू मुक्त केले. पोलीसांच्या या सहकार्याचे गावकऱ्यांनी कौतुक केले आहे.

> कुऱ्हा पोलीस स्टेशनचे स.पोलीस निरिक्षक डॉ अनुप वाकडे व त्यांच्या टिमने सालोरा (बु.) गावात दारूबंदी करून गावातील लोकांना दिलासा दिला आणि संपूर्ण गावातील लोक त्यांच्या मदतीसाठी पुढे आले.
>
> **राहुल तायडे, नागरीक सालोरा ( बु. )**

> ग्रामपंचायत सालोरा (बु.) यांनी दारूबंदीचा ठराव घेतला, तसेच गावातील अवैध दारू विक्री रोखण्यासाठी पोलीसांना सहकार्य देखील केल्याने हे सर्व शक्य झाले. आमच्या टिमने वेळीवेळी अवैध दारू विक्री वर धाडी टाकून गैरप्रकाराला लगाम लावला.
>
> **डॉ.अनुप वाकडे, पोलीस निरीक्षक कुऱ्हा.**

# वरुड येथे प्रादेशिक लोककला संवर्धन परिषद उत्साहात संपन्न

## फुले महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे आयोजन






### 70 संशोधकांचा सहभाग

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.14 ) -** श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित येथील महात्मा फुले कला वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे %प्रादेशिक लोककला संवर्धन% या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद मोठ्या उत्साहात पार पडली.

परिषदेअंतर्गत आयोजित चर्चासत्राचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख बीजभाषक डॉ. गणेश चंदनशिवे, विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता मोना चिमोटे, प्राचार्य पवन मांडवकर, डॉ. दिलीप हांडे, डॉ. चंदू पाखरे, प्रा. लक्ष्मण पवार आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या राष्ट्रीय परिषदेसाठी आलेल्या शोधनिबंधांचा समावेश असलेल्या लोकनाट्य स्मरणिकेचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ चंदू पाखरे यांच्या लोकदेव महादेव हा ग्रंथही यावेळी प्रकाशित करण्यात आला. लोककला संवर्धन ही काळाची गरज आहे. नवीन पिढीला हे लोकज्ञान देण्यासाठी, त्यांच्या जीवनात चैतन्याचा जिवंतपणा आणण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरेल, असा आशावाद हर्षवर्धन देशमुख यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

भारतीय ज्ञान-परंपरा हा महत्त्वपूर्ण विषय असून त्यात लोककलेचा विचार हवा. लोककलेतील विविध प्रकार, त्यामधून होणारे संस्कार, नीती मूल्य व संस्कृतीची जोपासना करण्यासाठी अशा नवोपक्रमाकरिता विद्यापीठ सतत प्रयत्नशील असेल, असे आश्वासन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी दिले.

दुसऱ्या सत्रात प्रादेशिक लोककलांचे निवडक सादरीकरण झाले. यामध्ये गणगवळण चंदू पाखरे, डॉ. प्रफुल गवई, प्रा. विजय शेंडे, लावणी दिया ताटर, बतावणी प्रा. उमेश गजभिये, संजय मैदानकर, भारुड डॉ. चंदू पाखरे, डॉ. प्रफुल्ल गवई, डहाका संजय जिचकार, प्रयाग जिचकार, रमेश कुरवाडे, विष्णू मतलाने, सुरेश पाटभाजे, दंडार शाहीर शैलेश पाटील व त्यांचा संच, डेसकू भीमराव सोळंके व त्यांचा संच, आदिवासी गोंडी नृत्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची चमू, वासुदेव प्रा. विजय शिंदे, पोतराज संतोष सुरकार, विना गजभिये, गोंधळ वर्धननेरी येथील चमू व सावंगी येथील संजय गजभिये यांनी लोकाविष्कारातून सादर केले. या सत्राचे संचालन डॉ. पंजाब फुंडकर यांनी केले.

तिसऱ्या सत्रात डॉ. काशिनाथ बर्हाटे यांच्या अध्यक्षतेखाली निबंध वाचन व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉ. भक्ते मोवाड, प्रमोद गारुडे आदी अभ्यासकांनी आपले निबंध वाचन करून परिसंवाद घडवून आणला. परिषदेचा समारोप डॉ. मनोज तायडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संतोष चव्हाण, डॉ. काशिनाथ बराटे, राजेंद्र हावरे, डॉ. अण्णा वैद्य, प्राचार्य दिलीप हांडे उपस्थित होते. उद्घाटन सत्राचे संचालन डॉ. चंदू पाखरे, दुसऱ्या सत्राचे संचालन डॉ. पंजाब कुंडकर तर तिसऱ्या सत्रात लक्ष्मण पवार व समारोप सत्रात छत्रभूज कदम यांनी संचालन केले. सर्व सत्राचे आभार प्रदर्शन प्रा. लक्ष्मण पवार, डॉ. करुणा डाके, स्वाती चोरे, प्रा. नंदकिशोर मरसकोल्हे, प्रा. वैशाली खेडेकर, प्रा. मो. अतिक यांनी केले. या परिषदेमध्ये 70 प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपले शोधनिबंध सादर केले.

# चारित्र्यावर संशय घेऊन छळ

**अमरावती -** वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 33 वर्षीय विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा छळ करण्यात आला. पती, सासू, सासरे यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप महिलेने तक्रारीतून केला आहे. याप्रकरणी महिलेने वरुड पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी पती, सासू आणि मेहुण्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# किशोर बोराटने बनलेत ग्राम विकास मंत्र्यांचे ओएसडी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.14 ) -** स्थानिक बुधवारा परिसरातील रहिवासी किशोर बोराटने यांची राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांचे विशेष कार्यकारी अधिकारी अर्थात ओएसडी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभारही स्वीकारला.

किशोर बोराटने यांना मंत्रालयीन कामकाजाचा दीर्घ अनुभव आहे. त्यांनी यापूर्वी अनेक मंत्र्यांचे ओएसडी म्हणून काम पाहिले आहे. राज्यातील बहुतांश आमदारांसोबत त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत. अधिवेशनादरम्यान जनतेशी संबंधित समस्या मंत्री महोदयांच्या माध्यमातून सुलभतेने सोडून घेण्यात त्यांचा हातखंडा आहे. यापूर्वी त्यांनी कामगार, कौशल्य विकास, महिला व बालकल्याण, वन व आदिवासी कार्य विभागाच्या मंत्र्यांकडे आपली सेवा दिली आहे. गत पंचवीस वर्षांपासून विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख आहे. फडणवीस उपमुख्यमंत्री व विरोधी पक्ष नेता असताना किशोर बोराटने त्यांचे कार्यालयीन स्वीय सहायक होते. त्यांची कार्यशैली पाहता, त्यांना पुन्हा एकदा मंत्रालयात विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून संधी देण्यात आली आहे. किशोर बोराटने हे बुधवारा



परिसरातील रहिवासी असून आझाद हिंद मंडळ व निळकंठ मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांच्या नियुक्ती बद्दल दोन्ही मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. किशोर बोराटने गुरव समाजातील एक घटक असून त्यांचे सर्वांशी एकोप्याचे संबंध आहे. या नियुक्ती बद्दल स्थानिक श्री शैव गुरव हितकारणी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी बोराटने यांचे अभिनंदन केले आहे.

# स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे माध्यम

## भैय्यासाहेब पुसदेकर यांचे प्रतिपादन ● आर. आर. लाहोटी महाविद्यालयात स्नेहसंमेलन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.14 )-** शाळा महाविद्यालयांमध्ये आयोजित केली जाणारी स्नेहसंमेलने ही विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारी माध्यमे आहेत, त्यातून विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांना उभारी मिळते, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. जयवंत उपाधख्य भैय्यासाहेब पाटील पुसदेकर यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित मोर्शीच्या आर. आर. लाहोटी महाविद्यालयात आयोजित स्नेहसंमेलनाच्या




उद्घाटनप्रसंगी भैय्यासाहेब पुजदेकर बोलत होते. वरुडच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंजाबराव फुंडकर यांच्या हस्ते या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद नरहरपंत गावंडे, नानासाहेब ठाकरे, दिनेश अर्डक, वामनराव बिडकर, वामनराव भडके, प्रभाकर खोडस्कर, महाविद्यालयाची प्राचार्य जी. एन. चौधरी, डॉ. प्रा. रवी धांडे, प्रा. विलास अंबाडकर, अश्विन लुंगे, विद्यार्थी प्रतिनिधी धनश्री साळवेकर उपस्थित होते. यावेळी डॉ. पंजाबराव फुंडकर यांचे %महात्मा फुले यांचे खरे वारसदार डॉक्टर पंजाबराव देशमुख% या विषयावर व्याख्यान पार पडले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य जी. एन. चौधरी यांनी तर संचालन रवी धांडे यांनी केले. प्रा. डॉ. अश्विन लुंगे यांनी आभार मानले. स्नेहसंमेलनादरम्यान क्रिकेट, कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन या क्रीडा स्पर्धांसोबतच पुष्पप्रदर्शनी, डिश डेकोरेशन, आनंद बाजार इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धा, गीत गायन स्पर्धाही घेण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केले. समारोपप्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

# तब्बल दोन दशकांनी एकत्र आले वर्गमित्र

## साफल्य विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे भावस्पर्शी स्नेहमिलन



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी( दि.14 ) -** तालुक्यातील सावरखेड पिंगळाईच्या साफल्य विद्यालयात 2003-04 यावर्षी शिक्षण घेतलेले विद्यार्थी तब्बल दोन दशकांनी शिक्षक कृतज्ञता व माजी विद्यार्थी स्नेहमिलन सोहळ्याच्या निमित्ताने एकत्र आलेत. शाळेच्या सभागृहात हा भावस्पर्शी सोहळा पार पडला.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत आजणकर हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून साफल्य विद्यालयातील सेवानिवृत्त मुख्याध्यापक व सत्कारमूर्ती आर. एन. मोहकर, विठ्ठलराव निचित, कैलास ठाकूर, विश्वासराव मनोहरे, विज्ञान शिक्षक एन. बी. सुळे, शारीरिक शिक्षक एच. डी. खैरकर, शिक्षकेतर कर्मचारी जाफरशा इनामदार, पी. व्ही. मडके, आर. बी. मालपे, बी. ओ. ठाकूर प्रामुख्याने उपस्थित होते.

सरस्वती पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी शाळा समितीचे सदस्य कैलास ठाकूर, विठ्ठलराव निचित यांनी मनोगत व्यक्त केले. पर्यावरण पूरक पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थी रुपेश सुरेश बेले यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. प्रास्ताविक नितीन ज्ञानेश्वर वानखडे तर आभार प्रदर्शन कु. सारिका साहेबराव टारपे यांनी केले. यावेळी माजी विद्यार्थी निलेश रामकृष्ण तायडे, रोशन सुभाष जोमदे, अनिल विश्वास मनोहरे, पुरुषोत्तम बबन मोरे, सागर शेषराव सावंत, अश्विनी अरविंद वाकडे, अवंतिका रामदास राऊत, जयमाला गणेश तंतरपाळे, पूजा माणिक वानखडे, पुनम रमेश वानखडे, पल्लवी गोपाराव टेकाडे, अमोल धनराज नेवारे यांनी मनोगत व्यक्त केले.

# वुमेन्स स्टडीज सेंटर आयोजित परिसंवाद स्पर्धेचा निकाल जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 14 ) -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत शैक्षणिक विभाग व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी 'लिंगभाव आणि समाज' या मुख्य विषयावर ज्ञानस्त्रोत केंद्रातील सेमिनार हॉलमध्ये परिसंवाद स्पर्धा झाली होती. या स्पर्धेचा निकाल(दि.12) जाहीर झाला आहे. या स्पर्धेत 'स्थलांतराचा स्त्रियांवर होणारा परिणाम', 'महिला उद्योजकता = आव्हाने आणि संधी' आणि 'समकालीन काळातील पितृसत्तेचे स्वरूप' असे तीन उप विषय देण्यात आले होते. विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख व शिक्षक आणि संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षक यांच्या सहकार्यामुळे स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत तक्षशिला महाविद्यालय, अमरावती येथील निधी देवरे यांचा प्रथम क्रमांक आला. श्री शिवाजी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील शिवानी जयस्वाल



यांचा द्वितीय क्रमांक आला तर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील नितीन गवई यांचा तृतीय क्रमांक आला. याशिवाय संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील अक्षरा धनधरे व सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अमरावती येथील पल्लवी गवई यांना प्रोत्साहनपर क्रमांक देण्यात आला. परिसंवाद स्पर्धेतील सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या परिसंवाद सादरीकरण स्पर्धेचे परीक्षण संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाच्या मा. प्रा. वनिता राऊत यांनी केले.

# पथ्रोट केंद्रावरून 245 विद्यार्थी देताहेत बारावीची परीक्षा

## अनुचित प्रकार टाळण्यासाठी सतर्कता

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.14 ) -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने संपूर्ण राज्यात सध्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात बारावीची परीक्षा घेतली जात आहे. अमरावती विभागांतर्गत पथ्रोट येथील स्वरूप सिंह कनिष्ठ महाविद्यालय हे बारावीच्या परीक्षेचे केंद्र आहे. या केंद्रावरही 11 फेब्रुवारीपासून बारावीच्या परीक्षेला सुरुवात झाली. या केंद्रावरून पथ्रोटसह परिसरातील विविध गावांतील कनिष्ठ महाविद्यालयांचे 245 विद्यार्थी परीक्षा देत आहेत. पहिल्या दिवशी इंग्रजी विषयाच्या परीक्षेकरिता 245 पैकी 237 विद्यार्थी हजर होते. आठ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. स्वरूप सिंह कनिष्ठ महाविद्यालयातील दहा खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षेची व्यवस्था करण्यात आली आहे. केंद्रावर कॉपीसारखे गैरप्रकार घडू नये, यासाठी संपूर्ण परीक्षा विभाग सतर्क आहे. परीक्षेदरम्यान केंद्रावर भरारी पथकातील गटशिक्षणाधिकारी गिरासे, श्रीकृष्ण तायडे, कान्हेरकर यांनी भेट देऊन पाहणी केली, तेव्हा कुठलाही अनुचित प्रकार आढळून आला नाही. केंद्रप्रमुख योगेश उमक यांच्यासह अन्य शिक्षक वृंद बारावीच्या परीक्षेचे संचलन करीत आहेत.

# अचलपूर महिला सहकारी बँक घोटाळ्यात एकाला अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.14 ) -** अमरावती जिल्हा महिला सहकारी बँकेच्या अचलपूर शाखेतील 41.96 लाख रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी पोलिसांनी बुधवारी सकाळी एका आरोपीला अटक केली आहे. मनोज शिवलाल बलकट (42, रा. टिंबर मार्ट वसाहत कॉलनी, परतवाडा) असे अटक आरोपीचे नाव आहे. हा घोटाळा 22 बनावट कर्ज प्रकरणांशी संबंधित आहे. ज्यामध्ये कथित सरकारी कर्मचाऱ्यांच्या नावावर कर्ज घेण्यात आले होते. या प्रकरणी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हृषीकेश संतोष भामोटकर यांच्या फिर्यादीवरून अचलपूर पोलिसांनी भूषण संके, रघुनंदन उपाध्याय आणि मनोज बलकट या तिन आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर हे तिन्ही आरोपी फरार होते. आरोपीने सरकारी नोकरीत नसतानाही बनावट रबर स्टॅम्प, कागदपत्रे आणि बनावट हमीपत्र वापरून बँकेकडून कर्ज मंजूर करून घेतल्याचे तपासात उघड झाले आहे. यामध्ये एकूण 22 प्रकरणांमध्ये बनावट कर्ज देण्यात आले.

# दाभाडा ग्रामपंचायत सरपंच-उपसरपंचसह तीन सदस्य अपात्र

## अप्पर जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगांव रेल्वे, ( दि. 14 ) -** येथील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या दाभाडा ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या मालमत्ता व पाणीपट्टी कर थकीत ठेवत विलंबाने चुकीच्या पध्दतीने भरणा केल्याचे चौकशी अहवालातून स्पष्ट झाल्याने ग्राम पंचायत सदस्य संजय पनपालिया यांच्या तक्रारीवरून दाखल करण्यात आलेल्या अपिल निकाली काढत अप्पर जिल्हाधिकारी यांनी सरपंच मुकुंद माहोरे, उपसरपंच स्नेहल राऊत यांच्यासह तीन



ग्रामपंचायत सदस्यांना अपात्र घोषित केले.

धामणगाव रेल्वे पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या दाभाडा येथील ग्रामपंचायत सदस्य मुकुंद बाबाराव माहोरे,किरण राजू थुल,स्नेहल प्रमोद राऊत, प्रतिभा सुरेश ठाकरे, संतोष हरीभाऊ ठाकरे, यांच्या विरोधात ग्राम पंचायत सदस्य संजय पनपालिया यांनी तक्रार दिली की, 2020-21 च्या निवडणूकीत निवडून आलेल्या वरील सदस्यांनी मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा वारंवार मागणी करूनही केलाह्व नाही. याबाबत तक्रारदाराने ग्रामपंचायतीला सतत माहिती मागीतली असता विलंबाने किंवा चुकीच्या पध्दतीने एकाच दिवशी थकीत रकमा भरल्याचे पावत्या खोट्या तारखा टाकून भरल्या गेल्याचा दाखविण्याचा प्रयत्न केला गेला. याप्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी यांनी सर्व चौकशी अहवाल व इतर प्रशासकिय दस्तावेजांची तपासणी केल्यानंतर मालमत्ता व पाणीपटट्टी कर थकीत ठेवणे भोवले. थकीत कराचा भरणा विविध मुदतीत भरणा न करता विलंबाने केल्याची बाब स्पष्ट झाल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1958 ची कलम 14 (1) (ह) तरतूदीनुसार वरील सदस्यांना अपात्र करण्याचा आदेश अप्पर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे यांनी निर्गमीत केला आहे.

### विभागीय आयुक्ताकडे दाद मागणार - मुकुंद माहोरे

अप्पर जिल्हाधिकारी यांनी आमच्या विरोधात दिलेला निर्णय अन्यायपूर्ण असून या विरोधात आता विभागीय आयुक्त यांच्या कडे याचिका दाखल करुण आम्ही दाद मागणार आहे. असे मुकुंद माहोरे यांनी सांगितले.

# चांदूर रेल्वे पोलिसांनी 3 लाखांच्या गांजासह तिघांना पकडले



## मालखेड रेल्वे ते बडनेरा रस्त्यावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.14 )-** तालुक्यातील मालखेड रेल्वे ते बडनेरा रस्त्यावर नाकाबंदी करून कारसह तीन संशईत व्यक्तींकडून 3 लाखाचा 15 किलो गांजा पकडल्याची कार्यवाही चांदूर रेल्वे पोलिसांनी मंगळवार ( ता.11) दूपारी 3.30 वाजताच्या दरम्यान केली.

चांदूर रेल्वे तालुक्यात पळसखेड हद्दीत राहणार एक युवक अंमली पदार्थाची वाहतुक करत आहे अशी गोपीनीय माहिती चांदूर रेल्वे पोलिसांना 11 फेब्रुवारी रोजी मिळाल्यावर चांदूर रेल्वे पोलिसांनी त्वरीत चांदूर रेल्वेचे एसडीपीओ यांच्या मार्गदर्शनात चांदूर रेल्वे तालुक्यातील मालखेड ते बडनेरा रस्त्यावर नाकाबंदी केली. त्यावेळी एक कार (एमएच-02 सीडी 2591) येतांना दिसली. त्यामध्ये 3 व्यक्ती मिळून आले. त्यांच्या वाहनाची झडती घेतली असता 3 लाख रूपयांचा 15 किलो गांजा मिळून आला. सदर ठिकाणी नियमानुसार जप्ती पंचनामा करून कलम 20 बी एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून हिमांशु नारायण शेन्डे रा. पळसखेड, मोहन मनदेव चव्हाण रा. मांजरी म्हसला व प्रविण चंदु चव्हाण रा. लालखेड यांना ताब्यात घेण्यात आले.

# शेतकरी केंद्रबिंदू मानून नियोजन करण्यात येईल!

## कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

**प्रदर्शनात 288 स्टॉल्स, 381 शेतकरी सहभागी | विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सची रंगत**




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती (दि.14 )**– प्रत्येक भागातील जमीन वेगळी असल्यामुळे वेगवेगळी पीके घेण्यात येतात. यासाठी आपण घेत असलेल्या पिकांना अनुसरून पूरक व्यवसाय निवडणे गरजेचे आहे. शेती हा आपला कणा असून शेतकरी केंद्रबिंदू मानून कृषी नियोजन करण्यात येईल, असे प्रतिपादन कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी आज येथे केले.

सायंन्सस्कोर मैदान येथे आजपासून सुरू झालेल्या कृषी विकास परिषद व प्रदर्शनीचे उद्घाटन कृषी मंत्री ॲड. कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुलभा खोडके, आमदार प्रवीण तायडे, आमदार राजेश वानखडे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, कृषी सह संचालक प्रमोद लव्हाळे, जिल्हा शेतकरी सल्लागार समितीचे अध्यक्ष नरेंद्र शिंगणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

कोकाटे पुढे म्हणाले, आपला देश कृषिप्रधान असल्यामुळे शेती आणि शेतकरी यांच्याशी प्रत्येकजण जुळलेला आहे. शेतीमध्ये मनुष्यबळाची कमतरता आहे. शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे वातावरण बदलाच्या संकटाला सामोरे जावे लागते. अशावेळी पूरक व्यवसाय मदतनीस ठरतात. बाजारात भाव मिळत नसल्याने शेतकरी अस्थिर असतो. यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेती उद्योगधंद्यांचे नियोजन करण्यात येईल. विद्यापीठातील पडित जमिनीवर चारा लागवड व्हावी. जेणेकडून जमीनही उपजाऊ राहील आणि शेतकऱ्यांना पशुसंवर्धनासाठी मदत होईल. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कृषी विकास परिषद व प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती मिळेल. याच धर्तीवर अन्य जिल्ह्यातही अशा स्वरूपाच्या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात येईल. याबाबत शेतकऱ्यांच्या सूचना विचारात घेवू. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शेतीमध्ये मनुष्यबळाला पर्याय नाही. नवीन एआय तंत्रज्ञानामुळे शेती अधिक फायदेशीर ठरावी, अधिक उत्पन्न अल्पावधीत घेता यावे यासाठी नवीन तंत्रज्ञान मदतनीस ठरेल. कृषी विद्यापीठामार्फत उत्कृष्ट वाण निर्मितीसाठी प्रयोग करण्यात यावे. शेतकरी खऱ्या अर्थाने समाधानी होण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कृषी मंत्री ॲड. कोकाटे यांनी कृषी प्रदर्शनीतील विविध स्टॉल्सला भेटी देऊन स्टॉलधारकांशी संवाद साधला. येथे कृषी यंत्रे, अवजारे, धान्य, गृहपयोगी वस्तु, मिलेट्स उत्पादने, बांबूच्या वस्तू, सिंचन साधने, कृषी निविष्ठा, सेंद्रिय धान्य, विविध शासकीय दालने, विविध खाद्यपदार्थ आदी स्टॉल्स लावण्यात आले आहेत. आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी प्रास्ताविक केले. क्षिप्रा मानकर यांनी संचालन तर आभार राहुल सातपुते यांनी मानले.

### जिल्हास्तरावर कृषी मंत्री कक्ष स्थापणार

शेतकऱ्यांना जाणवणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना, तसेच शेतकऱ्यांच्या वतीने येणाऱ्या सूचनांसाठी जिल्हास्तरावर कृषी मंत्री कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या कक्षाला प्राप्त सूचना 24 तासाच्या आत मंत्रालयात कळविण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकोटे यांनी दिली.

# विद्यार्थ्याला 12 हजारांमध्ये पडले नविन आधारकार्ड

## परिक्षेलाही बसता आले नाही




**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड,( दि.14 )**– आधारकार्ड हरविल्याने दुसरे आधारकार्ड बनविणे तब्बल 12 हजारात पडले, इतकेच नाही, तर नविन आधारकार्ड वेळेवर न मिळाल्याने त्या विद्यार्थ्याला पदवी परिक्षेलाही बसता आले नाही, या सर्व प्रकारामूळे या विद्यार्थ्याला व त्याच्या कुटूंबियांना आर्थिकसह मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले.

गौरव राजेंद्र काळे (रा.हिवरखेड) असे त्या विद्यार्थ्याचे नाव आहे. गौरवचे काही दिवसांपुर्वी आधारकार्ड हरविले. त्यामूळे तो दुसरे आधारकार्ड काढण्याकरिता सेतू केंद्रावर गेला, परंतू त्याच्या आधारकार्डला मोबाईल नंबर लिंक नसल्यामूळे त्याचे आधारकार्ड निघू शकले नाही. मोर्शी येथील सेतू केंद्रावर जावून आधारकार्ड काढण्याकरिता केलेले प्रयत्न निष्फळ ठरले. त्यानंतर त्याने गावातच हिवरखेड येथे आधार कार्ड अपडेट करण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केले. परंतू यश आले नाही. त्यानंतर गौरवने वरुड येथे जावूनसुध्दा प्रयत्न केले, परंतू आधारकार्ड निघू शकले नाही. गौरवने अखेर जिल्हाधिकारी कार्यालय गाठले, तेथून त्याला माहिती मिळाली की, मुंबईला आधार कार्ड नोंदणीचे मुख्य कार्यालय आहे. त्यानंतर गौरवने थेट जीवाची मुंबई करत मुख्य कार्यालय गाठले. गौरव तेथे एक सोडून दोनवेळा गेला, मात्र तेथे सुध्दा त्याचे कार्ड तयार झाले नाही. त्यानंतर पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयातूनच आधार कार्ड तयार करण्याकरिता त्याने प्रयत्न केले. कारण आधारकार्ड शिवाय त्याला पदवी परिक्षेलाही बसता येणार नव्हते. अखेर साडेतीन ते चार महिन्यांनंतर गौरव चे आधार कार्ड घरपोच आले. मात्र आधार कार्ड नसल्यामुळे त्याला महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही, आणि परिक्षेलाही बसता आले नाही. सोबतच आधारकार्ड काढण्याच्या प्रयत्नात गौरवचे जवळपास 12 हजार रुपयेसुध्दा खर्च झाले.

### अनेक गावकरी आधारकार्डशिवाय

आधारकार्ड काढणे डोकेदुखी असल्याचे मानत हिवरखेडमधील अनेक गावकऱ्यांनी आधारकार्डच काढले नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामूळे आधारकार्ड काढणे ही प्रक्रीया सुलभ व सरळ करण्याची मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

# आ. केवलराम काळे यांनी केली स्कायवॉकच्या कामाची पाहणी



**■ सिडकोच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा**
**■ काम तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश**

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.14 )**– राज्य सरकारच्या वतीने सिडकोच्या माध्यमातून चिखलदऱ्यातील हरिकेन पॉईंट वर स्कायवॉक या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी सुरू आहे. मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी प्रकल्पस्थळी जाऊन प्रगतीपथावर असलेल्या स्कायवॉकच्या कामाची पाहणी केली. यावेळी आमदार काळे यांनी कामासंदर्भात सिडकोच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प तात्काळ पूर्णत्वास नेण्यासाठी कामाला गती देण्याचे आदेश केवलराम काळे यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना दिले. स्कायवॉकचे काम करत असताना काही अडचणी किंवा समस्या येत असतील तर त्या आपल्याला सांगाव्या, शासकीय स्तरावर त्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले. स्कायवॉक प्रकल्पाच्या ठिकाणी येणाऱ्या वाहनांसोबतच त्यांच्या पार्किंगची व्यवस्था कशाप्रकारे करण्यात येत आहे, याचीही आ. केवलराम काळे यांनी पाहणी केली. हा प्रकल्प चिखलदऱ्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरणार आहे. त्यामुळे स्कायवॉकची उभारणी करताना नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी सूचना केवलराम काळे यांनी अधिकाऱ्यांना दिली. यावेळी आमदार काळे यांच्या समवेत भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंजनगाव ग्रा.पं. मध्ये 4 वर्षापासून 4 पदे रिक्त

**कंत्राटी कर्मचारी चालवितात कारभार | पदभरतीबाबत प्रशासन उदासिन**

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि. 14 )** अंजनगाव बारी ग्राम पंचायतमधील चार कर्मचाऱ्यांची पदे गेल्या चार वर्षांपासून रिक्त आहेत. या पदभरतीबाबत प्रशासन पूर्णतः उदासिन असल्याने कर्मचाऱ्यांची नियुक्ती केव्हा होणार, याबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे. सध्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून ग्रामपंचायतची संबंधित कामे पूर्ण केली जात आहेत. त्याचा विपरित परिणाम ग्रामपंचायतच्या कारभारावर पडल्याचे दिसून येत आहे.

अंजनगाव बारी ग्राम पंचायतमध्ये लिपीक, पाणीपुरवठा विभाग कर्मचारी, कोंडवीर तसेच संगणक परिचालक ही पदे गेल्या चार वर्षांपासून रिक्त असल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासंदर्भाने प्रशासनाकडून कोणत्याही हालचाली होताना दिसून येत नाही. ही पदे कायमस्वरुपी भरण्याऐवजी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून तात्पुरत्या स्वरुपात कामे करुन घेण्याकडेच प्रशासनाचा कल दिसून येत आहे.

ही पदे कायमस्वरूपी भरण्याची मागणी अनेक वेळा नागरिकांनी करूनही सचिव, सरपंच व सदस्य यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे. सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये प्रशासकिय राजवट आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही याबाबत मागणी करण्यात आली. कात्र त्यांनीही या मागणीची दखल घेतली नाही. कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून रोजंदारीवर ग्रामपंचायतचे प्रशासन किती दिवस चालविणार, असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत. ग्रा.पं.च्या मासिक सभेमध्येही हा विषय स्थानिक प्रशासन विचारात घेत नसल्याचे चित्र आहे. कंत्राट मजुरांकडून वेळेवर कामे होत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. दरम्यान ग्रामपंचायत रिक्त पदभरतीबाबत झालेल्या मासिक मिटींगमध्ये चर्चा सुरू असुन यावर लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. असे ग्रामविकास अधिकारी विनोद इसळ यांनी सांगितले आहे.

# ॲल्युमिनियमची तार लंपास

**अमरावती** – बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाला फार्म परिसरातील विजेच्या पोलला लावलेली 180 मीटर ॲल्युमिनियमची तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. मुख्य तंत्रज्ञ ममता वरकडे यांच्या फिर्यादीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास बडनेरा पोलिस करीत आहे.

# राज्य शिक्षक संघाचे जिल्हास्तरीय अधिवेशन 16 ला

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.14 )**– अमरावती विभागातील शिक्षकांची महत्वपूर्ण संघटना असलेल्या राज्य शिक्षक संघाचे जिल्हा अधिवेशन रविवार 16 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता आयोजीत करण्यात आले आहे.

या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक संघाचे मार्गदर्शक संजय खोडके हे राहतील. माजी शिक्षण सहसंचालक संजय गणोरकर यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांचा शिक्षक संघाच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नुटाचे जिल्हा अध्यक्ष प्रा.डॉ.महेंद्र मेटे, अध्यक्ष, राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू, अरुणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे, विजुक्टाचे विभागीय मार्गदर्शक अरविंद मंगळे, मेस्टा, अमरावतीचे अध्यक्ष संदीप गावंडे, उर्दू शिक्षक संघाचे अध्यक्ष काजी मो. वजाहत अली गाजी, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रविण दिवे, राज्य शिक्षक संघाचे सरचिटणीस भोजराज काळे, उर्दू टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष जहरोश गाजी, विदर्भ मुख्याध्यापक संघाचे सचिव सुरेंद्र कडू हे उपस्थीत राहणार आहेत. हे अधिवेशन शिक्षक चळवळीला बळ देणारे व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना उर्जा देणारे ठरेल असे राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू यांनी म्हटले आहे.

या अधिवेशनात सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणे, पदभरतीवरील बंदी उठवणे, 24 वर्षानंतर सर्व शिक्षकांना सरसकट विनाअट निवड श्रेणी लागू करणेबाबत ठराव मंजूर करण्यात येणार आहे. सर्व शिक्षक बंधु–भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित रहावे, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

# शिरजगाव कसबा येथे अवैध वाळू तस्करी जोरात?

**समिती आणि पथकाचे अस्तित्व केवळ कागदावर | तस्करांचे प्रशासनात लागेबांधे**



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार( दि.14 )** – चांदूर बाजार तालुक्यातील शिरसगाव कसबा महसूल मंडळा अंतर्गत अवैध उत्खनन करून मोठ्या प्रमाणावर वाळूची तस्करी सर्रास सुरू असल्याचे दृश्य नजरेस पडत आहे. प्रशासनाच्या डोळ्यादेखत हा अवैध व्यवसाय सुरू असला तरी त्याला पायबंद घालण्यासाठी कुठलीही उपायोजना केली जात नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. वाळू तस्करी रोखण्यासाठी महसूल विभागाने तयार केलेल्या समित्या आणि पथकांचे अस्तित्व केवळ कागदोपत्री कायम असल्याचे दिसून येते.

शिरजगाव कसबा महसूल मंडळांतर्गत मेघा, चारघड, पूर्णा या नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या उत्खनन केले जात आहे. त्यातून मिळालेल्या वाळूची राजरोसपणे चोरट्या मार्गाने तस्करी केली जाते. अवैध तस्करी रोखण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात चांदूरबाजारच्या तहसीलदारांनी पथक तयार केले होते. मात्र हे पथक वाळू तस्करी रोखण्यात कुचकामी ठरले आहे. त्यासोबतच गाव पातळीवर तलाठी, मंडळ अधिकारी यांच्याकडून वाळू तस्करांवर कुठलीही कारवाई केली जात नसल्याचे दिसून येत आहे. शिरजगाव कसबा पोलीसही या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे. परिणामी या वाळू तस्करांची हिम्मत प्रचंड वाढली असून त्यांना कुणाचाही धाक राहिलेला नाही.


अवैध वाळू तस्करीच्या व्यवसायात गुंतलेल्या अनेक लोकांचे प्रशासनात लागेबांधे आहेत. काही जणांचे नातेवाईकच महसूल आणि पोलीस विभागात कार्यरत असून त्यांच्या आशीर्वादानेच खुलेआम वाळू तस्करी सुरू असल्याचे बोलले जाते. वाळू तस्कर आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांचे आर्थिक लागेबांधे असल्याचीही चर्चा आहे.अधिकारी बदलूनही रेती तस्करीवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण प्रशासनाला मिळविता आलेले नाही. त्यामुळे या गोरखधंद्याला आळा कोण घालणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### तहसिलदारांची नोटीस केराच्या टोपलीत

काही दिवसांपूर्वी शिरसगाव कसबा येथील तलाठ्याने वाळू तस्करी विरोधात कोणतीही कारवाई केली नसल्याने त्यांना तहसीलदारांनी नोटीस बजावली होती. मात्र त्याचाही काहीच उपयोग झाला नाही. वाळू तस्करीचे प्रमाण वाढतच आहे. शिरजगाव कसबा येथून दररोज 12 ट्रॅक्टरद्वारे पाळा, पांढरी, शिरसगाव कसबा, देऊरवाडा येथील नदीपात्रातून वाळू उपसा केला जात असल्याचे समजते. या सर्वांना सुनील नामक व्यक्तीचा आशीर्वाद असल्याची चर्चा आहे. त्याच्यामुळेच तस्करांविरुद्ध कारवाई टाळली जात असल्याचे बोलले जाते.

# वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या पर्यावरण शास्त्र विभागाची शैक्षणिक सहल

**धारणी तालुक्यातील मांडवा प्रकल्पाला भेट**



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.14 )** – वसंतराव नाईक महाविद्यालयातील पर्यावरण शास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांची एक दिवसीय शैक्षणिक सहल नुकतीच आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. विजयकुमार गवई यांच्या मार्गदर्शनाखाली धारणी तालुक्यातील मांडवा प्रकल्प येथे भेट दिली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षातील बीए, बीकॉम आणि बीएस्सी च्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयक दौरा करणे अनिवार्य आहे. त्यानुसार ही शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. मांडवा धरण येथे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांनी प्रकल्पाच्या स्थापनेपासून तर आतापर्यंतची संपूर्ण माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी धरणातील पाण्याचे नमुने गोळा केले व त्याचे निरीक्षण केले. पाण्यात वाढणारे कीटक, मासे, वनस्पती आदीबाबत विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली. महाविद्यालयाच्या पर्यावरण शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. बी. आर. भोसले यांनी प्रदूषण आणि त्याचा नैसर्गिक स्त्रोतांवर होणारा दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. मांडवा धरण हे जलसिंचन तसेच पिण्याच्या पाण्यासाठी उत्तम माध्यम असल्यामुळे या धरण क्षेत्रात प्रदूषण कसे रोखता येईल, याबाबत चिंतन करण्यात आले. या सहलीला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सहली दरम्यान पर्यावरण संवर्धनाची शपथ सुद्धा घेण्यात आली. जलसंपदा विभागाचे कर्मचारी सुरेंद्र बेलसरे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण माहिती दिली. प्रा. नितीन खंडारे यांनी सुद्धा वनस्पती शास्त्रासंदर्भात मार्गदर्शन केले. या सहलीकरिता महाविद्यालयातील डॉ. प्रदीप शेंडे, हिमांशु झापर्डे, प्रा. विनोद रोडे, डॉ. रमेश बहादुरे तसेच आनंद नांदुरकर, रेखा काळे, ज्योती मेटकर, फरीहा शेख यांचे सहकार्य लाभले.